# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.सहा.आ/ए /०४१/ओडी/घकव्य/दि. १७/०४/२०१८**

**विषय -** पावसाळयापुर्वी रस्त्यालगतच्या प.ज.वा. जलमुख (SWD) / लॅटरल मधुन गाळ काढणे व 'ए' विभागातील झोपडपटटी वसाहतीमधील चेंबर्स मधुन गाळ काढणे, तसेच पावसाळया दरम्यान पुरनियंत्रण कामाकरीता एन. जी. ओ. कामगार पुरवठा करण्यासंबंधी सुचना.

सदर सुचनेद्वारे नोंदणीक्रुत सर्व एन.जी.ओ. संस्थांना कळविण्यात येते की, 'ए' विभागातील पावसाळयापुर्वी रस्त्यालगतच्या प.ज.वा. जाळी / लॅटरल मधुन गाळ काढणे व 'ए' विभागातील झोपडपटटी वसाहतीमधील चेंबर्स मधुन गाळ काढणे, तसेच पावसाळया दरम्यान पुरनियंत्रण कामाकरीता खालील अटीनुसार कामगार पुरविण्याबाबत इच्छुक एन.जी.ओ. संस्थांनी सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग, कार्यालय इमारत, १३७-ई , शहिद भगतशिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१ हयांचे नावे नोंदणी प्रमाणपत्रे व अनुभव इत्यादी आवश्यक कागदपत्रांसहित दिनांक २३.०४.२०१८ रोजी दुपारी ०१.०० वाजे पर्यंत इच्छापत्र मोहरबंद लिफाफा आपत्कालीन कक्ष, 'ए' विभाग, तळमजला, नियंत्रण कक्ष, येथे सिलबंद पेटीत टाकावे.

एन.जी.ओ. संस्थानी अर्जासोबत खालील **कागदपत्रांची / नियमांची** पुर्तता करणे आवश्यक आहे.

1. सदर कामासाठी 'ए' विभागातील पर्जन्य जलवाहीनी कामाचा अनुभव असलेल्या संस्थाना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
2. 'ए' विभागातील अधिका-यांच्या सुचनेनुसार रोजच्या कामाकरीता मागणी केलेल्या (दिवस / दुपार / रात्र) सुरळीतपणे, विनाविलंब, सक्षम कामगारांचा पुरवठा करणे.
3. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने नेमणूक करण्यात येणा-या संस्थानी अनामत रक्कम म्हणून रु. १०,०००/- मुंबई महानगरपालिका यांच्याकडे डी डी / रोख स्वरुपात जमा करावेत. सदर रक्कम काम यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर परतावा करण्यात येईल.
4. एन.जी.ओ. सस्थांनी मागील तीन वर्षामधील आर्थिक वर्षापैकी एका वर्षाचा ताळेबंद अहवाल संस्थेच्या अर्जासोबत जोडावा.
5. दिलेल्या पात्रतेच्या अटी व शर्तीनुसार अर्जाची छाननी केली जाईल. सर्व पात्र संस्थांमधून सोडत पध्दतीने संस्थांची नेमणूक करण्यात येईल. या विभाग कार्यालयाने पात्र संस्थांस कोणत्या स्वरुपाचे काम दयावयाचे याबाबतचे सर्व अधिकार राखून ठेवले आहेत. तसेच पात्र संस्थांस ज्या स्वरुपाचे काम देण्यात येईल त्या स्वरुपाचे काम करणे त्यांना बंधन कारक राहील.
6. एन.जी.ओ. संस्थानी कामाच्या पुर्ततेसंबंधी शपथपत्रे 100 रु. स्टॅम्पपेपर वर दयावेत आणि संस्थानी महानगरपालिकेकडे नोंदणी केलेले वेंडर नंबर आणि बँक खात्याचा तपशिल अर्जासोबत सादर करावीत.
7. अ) संस्थांनी त्यांच्या सर्व सभासदांना काम सुरू करताना ओळखपत्र, हजेरी कार्ड देणे बंधनकारक राहिल.
   ब) संस्थांनी विभाग नुसार स्ववंसेवक वर देखरेख करिता एक supervisor नेमणे बंधनकारक राहिल.
   क)प्रत्येक संस्थेने दैनंदिन कामाचे PHOTOS काढुन संबंधित विभागाकडे नियमित सादर करणे बंधनकारक राहिल.
8. पावसाळया दरम्यान ए विभागात कुठेही पाणी साचू नये तसेच कोणतेही पूरसदृष्य स्थिती उद्धवू नये याकरीता सदर काम अति महत्वाचे व वेळेत पुर्ण होण्याची दक्षता सदर संस्थेने घेण्यात यावी.
9. वरील अटींचे पालन न करणा-या व समाधानकारकरित्या काम न करणा-या एन.जी.ओ. संस्थेचे काम त्वरित थाबंविण्याचे अधिकार सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग हयांचे राहतील.

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'ए' विभाग**